# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी : २५६०१२६०
तारेचा पत्ता : 'युनिपुना'
फॅक्स : ०२०–२५६९१२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ : शै.प्रवेश/ ७८७८

दिनांक : 23 JUN 2011

प्रति,
**मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख.**
पुणे विद्यापीठाशी संलग्न असणारी सर्व महाविद्यालये/
मान्यताप्राप्त संस्था आणि सर्व शैक्षणिक विभाग, पुणे विद्यापीठ

**विषय** : कै. यशवंत अंबुजी सोनावणे यांच्या पाल्यांना प्रवेश देण्यासंदर्भात व शुल्कासंदर्भातील शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत..

महोदय/महोदया,

सोबत शासन निर्णय क्र. टीईएम२०११/(६६/११)तांशि–४ दि. ८.४.२०११ जोडला आहे.

नाशिक जिल्हयातील मालेगावचे अप्पर जिल्हाधिकारी कै. यशवंत अंबुजी सोनावणे हे आपले कर्तव्य बजावत असताना, त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला व त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. त्यांच्या कुटुंबियांना आधार देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सोबतचा निर्णय निर्गमित केलेला आहे. त्याची अंमलबजावणी करावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

२३/६/११

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश

**सोबत** : वरीलप्रमाणे.

के. श्री. यशवंत सोनावणे, अपर जिल्हाधिकारी, मालेगांव, जि. नाशिक यांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत.

Inward No.:
Date :
BCUD
University of Pune

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. टीईएम २०११/(६६/११)/तांशि-४
दिनांक : ८ एप्रिल, २०११

संदर्भ : शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. आरएलएफ-२०११/ प्र.क्र.०३/म-३, दिनांक ७ मार्च, २०११.

**प्रस्तावना** : दिनांक २५ जानेवारी, २०११ रोजी नाशिक जिल्हयातील मालेगावचे अपर जिल्हाधिकारी श्री. यशवंत अंबुजी सोनावणे हे आपले कर्तव्य बजावित असताना त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला व त्यांची निर्घृण हत्या करण्यात आलेली आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या कुटुंबियांना योग्य तो आधार मिळण्यासाठी शासनाने एक विशेष बाब म्हणून संदर्भाधीन दिनांक ७.३.२०११ च्या शासन निर्णयान्वये त्यांच्या कुटुंबियांना विनामुल्य सदनिका, शासकीय निवासस्थान, कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी, सानुग्रह अनुदान, कुटुंबियांना वेतन आणि मोफत शिक्षण आदी सुविधांचा अंतर्भाव आहे. त्यापैकी मोफत शिक्षणाची बाब या विभागाशी देखील निगडित असून दिवंगत, श्री. सोनावणे यांच्या कुटुंबियांना उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमांमध्ये मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देण्याची बाब या विभागाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : दिनांक २५ जानेवारी, २०११ रोजी नाशिक जिल्हयातील मालेगावचे अपर जिल्हाधिकारी, श्री. यशवंत अंबुजी सोनावणे हे आपले कर्तव्य बजावित असताना त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला व त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली. याबाबत त्यांच्या कुटुंबातील २ अपत्यांना उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत येणा-या पदव्युत्तर पदवी स्तरापर्यंतच्या सर्व अभ्यासक्रमांना मोफत शिक्षणाची सुविधा देण्यात येईल.

२. यामध्ये पारंपारिक शिक्षणासह व्यावसायिक/अभियांत्रिकी आणि व्यवस्थापकीय शिक्षणाचा समावेश राहील.

३. सदरहू योजना शासनाच्या शिक्षण संस्था, अशासकीय अनुदानित शिक्षण संस्था, स्वायत्त शिक्षण संस्था, कायम विना अनुदानित शिक्षण संस्था, अभिमत विद्यापीठे, इत्यादी राज्यातील सर्व शिक्षण संस्थांमध्ये शिकविल्या जाणा-या अभ्यासक्रमांना लागू राहील.

४. सदर विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी लागणा-या शिक्षण शुल्काची १०० टक्के प्रतिपूर्ती शासनामार्फत करण्यात येईल.

५. ज्या संस्थांना शासनाकडून अनुदान दिले जात नाही, अशा संस्थांना शिक्षण शुल्काची तसेच इतर सर्व शुल्काची अदायगी शासनाकडून करण्यात येईल.

६. या योजनेकरिता विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व संचालक, तंत्र शिक्षण यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

७. या योजनेपोटी येणारा खर्च लेखाशीर्ष २२०३, तंत्रशिक्षण, १०७ शिष्यवृत्या पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (००)(०६)(२२०३०७४८) मध्ये खर्च दाखविण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय महसूल व वन विभागाच्या क्रमांक आरएलएफ-२०११/प्र.क्र.०३/म-३, दिनांक ७ मार्च, २०११ च्या शासन निर्णयात विहित केल्याप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

विभागीय आयुक्त (महसूल), विभाग नाशिक.
जिल्हाधिकारी, जिल्हा नाशिक
संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय सहसंचालक (तंत्रशिक्षण)
महालेखाकार (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक
कुलगुरु, सर्व विद्यापीठे
निवडनस्ती/तांशि-४